पुण्य नगरी | बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी आणि नियमिततेने यश मिळवावे : उरुणकर

## एज्युकेशनल फेअर व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी कठीण परिस्थितीत योग्य आणि सोपे काय आहे, याचा विचार करून निर्णय घ्यावा. असे निर्णय घेता आले, तर आवडीच्या क्षेत्रात यश मिळते. चांगल्या सवयी, काटेकोर नियम, सुलभ शिस्त आणि नियमितता आयुष्याचा अविभाज्य भाग बनवा, तसेच यशाचा सिद्धांत ठेवून नियमित अभ्यास करण्याची सवय वाढवा, असे मार्गदर्शन व्याख्याते विक्रांत उरुणकर यांनी केले. ज्युनिअर आर्टस्, कॉमर्स विभागातर्फे आयोजित एज्युकेशनल फेअर अंतर्गत व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्युनिअर आर्टस्, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले यांनी भूषवले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. स्वागत व प्रास्ताविक प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. आभार प्रा. बी. एस. कोळी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. एस. पी. वेदांते आणि प्रा. अश्विनी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमास ज्युनिअर विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.